# MT

Seat No. | | | | | | | |

2018 .... .... 1100

MT - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - SEMI PRELIM - I - PAPER - V

**Time : 3 Hours** **(Model Answer Paper)** **Max. Marks : 100**

विभाग १ – गद्य

उ.१ **अ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **(i) एका वाक्यात उत्तर लिहा.** 1

कुणीतरी काँक्रिट फोडून रेल्वेचे रुळ वेडेवाकडे करून ठेवल्याचे निरंजनच्या ध्यानी आले.

**(ii) कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** 1

या <u>पुलामुळं</u> जाणं-येणं सोपं झालं होतं.

(२) **खालील घटनांचे परिणाम लिहा.** 2

| घटना | परिणाम |
|---|---|
| (i) आता नऊ पन्नासची गाडी येईल. | धाड्धाड् आवाज करत दिमाखात पुलावरून जाईल. |
| (ii) दगड बाजूला ठेवायचे विसरलात. | तर दुसरा ठेचकाळून जीवाला मुकेल. |

(३) **व्याकरण :**

**(i) अधोरेखित शब्दाची जात ओळखा.** 1

शब्दयोगी अव्यय

**(ii) समानार्थी शब्द लिहा.** 1

१. सरिता – नदी २. नवल – आश्चर्य

(४) **स्वमत :** 2

आम्ही सर्व मुले मे महिन्याच्या सुट्टीत हिमाचलप्रदेशाच्या डोंगरात गिर्यारोहणासाठी गेलो होतो. नदीवरचा पूल ओलांडायचा होता. २५ जणांचा चमू घेऊन जाण्याची जबाबदारी माझ्यावर होती. निसर्ग सौंदर्य न्याहाळत सर्वजण पूलावरून जात असताना माझे लक्ष पूलाच्या पुढच्या टोकाकडे गेले. दोरखंडांनी बांधलेल्या पूलाचे एक दोरखंडी टोक तुटून गेले होते. प्रसंगावधान राखून मी सर्व मुलांना मागे जाण्याचे आदेश दिले. दुसऱ्या बाजूने उतरून गावकऱ्यांना सूचित केले. पूल ताबडतोब वापरण्यासाठी बंद करण्यात आला व मोठी मनुष्यहानी टळली.

उ.१ **आ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **आकृतिबंध पूर्ण करा.**

(i) **लेखकाच्या खेळाबाबत स्तुतीपर उद्‌गार ऐकून यांना आनंद वाटे.** → लेखकाच्या आई वडिलांना — **1**

(ii) **लेखकाचे वडील याबाबतीत कडक होते.** → अभ्यास, शाळा — **1**

(२) (i) **कारण लिहा.** — **1**

लेखक एके दिवशी शाळा चुकवून ग्राऊंडवर क्रिकेटचा एक मित्रत्वाचा सामना पाहण्यास गेले. त्यामुळे वडिलांनी संतापाने लेखकास छड्या मारल्या.

(ii) **एका वाक्यात उत्तर लिहा.** — **1**

लेखकांचे वडील 'व्हॉलीबॉल' या खेळात चॅम्पियन होते.

(३) **व्याकरण :**

(i) **खालील वाक्यातील क्रियापद ओळखा व लिहा.** — **1**

क्रियापद - देत

(ii) **काळ ओळखा.** — **1**

वर्तमानकाळ

(४) **स्वमत :** — **2**

वडिलांची बदली वडगावाला झाल्यावर लेखकाने त्यांच्या बरोबर जाण्याचा आग्रह धरला; परंतु त्यांनी मोठे व्हावे, ऑफिसर व्हावे हे वडिलांचे स्वप्न असल्यामुळे त्यांना काकांकडे राहावे लागले.

दुसरा प्रसंग लेखक मित्रांसोबत शाळा बुडवून मॅच बघण्यासाठी गेले. हे वडिलांना कळल्यावर त्यांच्याकडून संतापाने छड्या खात लेखकास शाळेत जाऊन बसावे लागले.

अशाप्रकारे अभ्यास व शाळा याबाबत वडील कडक स्वभावाचे होते हे जाणवते.

## अपठित गद्य

उ.१ इ. **खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **खालील कृती पूर्ण करा.**

| | | | |
|---|---|---|---|
| (i) खरा ध्येयवादी याला म्हणावा | - | कशासाठी काय सोडायचे हे ज्याला बरोबर कळते | 1 |
| (ii) आफ्रिकेत धर्मोपदेश करणार नाही तर | - | फक्त वैद्यकीय मदतीचे काम करणार. | 1 |

(२) **फक्त नावे लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| (i) लोकमान्य टिळक यांचा आवडीचा विषय | - | गणित | ½ |
| (ii) संत तुलसीदासांनी यांचा त्याग केला | - | पत्नी | ½ |
| (iii) ध्येयाशी मैत्री करायची तर हे सोडावे लागते | - | सुखाची संगत | ½ |
| (iv) धर्माच्या सेवेसाठी संभाजी महाराजांनी त्याग | - | देहत्याग | ½ |

(३) **व्याकरण :**

**खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांचे वचन बदलून वाक्य लिहा.**

(i) फक्त वैद्यकीय मदतीची <u>कामे</u> करीन. 1

(ii) ध्येयापुढे <u>आवडी</u> बाजूला साराव्या लागतात. 1

(४) **स्वमत :** 2

संत तुलसीदास यांचा जन्म इसवी सन १४९७ या वर्षी सध्याच्या उत्तर प्रदेश या राज्यातील चित्रकुट जिल्ह्यातील राजापूर येथे झाला. तुलसीदास यांनी भारतभर भ्रमण केले. तत्कालीन हिंदू समाजावर झालेली आक्रमणे पाहून ते अतिशय दु:खी झाले. त्यांनी भारतातील सर्व राजांना एकत्र आणण्यासाठी खूप प्रयत्न केले, पण हे प्रयत्न सफल झाले नाहीत. तरीही तुलसीदासांनी या आक्रमणाचे स्वरुप समजावून सांगितले. प्रबोधन केल्याने अनेक राजांनी सामना केला. सामान्य लोकांमध्येही त्यांनी जनजागृती केली. हिंदु धर्म हा एक आहे, त्यास पंथात विभागू नका हे त्यांनी सांगितले. तुलसीदासांनी रामलीला या नाट्य-प्रकाराची सुरुवात केली. काशी आणि अयोध्या येथे 'श्रीरामचरितमानस' आणि 'विनय पत्रिका' या रचना केल्या. आजचा सुप्रसिद्ध पाठ 'हनुमान चालीसा' ही तुलसीदासांची रचना आहे. 'श्रीरामचरितमानस' लिहिण्यास त्यांना प्रत्यक्ष भगवान श्रीराम यांनी आज्ञा केली होती असे मानतात. त्यांनी संस्कृतमधील 'वाल्मिकी रामायणाचे' अवधी भाषेत रूपांतर करून त्यांचे नाव 'रामचरितमानस' असे ठेवले. हे लेखन त्यांनी निव्वळ सव्वीस दिवसात पूर्ण केले.

**विभाग २ – पद्य**

उ.२ **अ. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) (i) **आकृतिबंध पूर्ण करा.** 1

**झाड कोणाप्रमाणे नवीन वस्त्र धारण करते** → नव्या नवरीसारखं

(ii) **कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** 1

<u>पक्षी</u> झाडांचे कुणीच नसतात तरीही झाड त्याचं असतं.

(२) (i) **सहसंबंध लिहा.** 1

शरीरभर विरघळतो : हिरवा रंग : : क्षणभर रक्त : <u>**हिरवेगार**</u>

(ii) **खालील प्रश्नाचे उत्तर एका वाक्यात लिहा.** 1

झाड ध्यानस्थ ऋषीसारखे बसते.

(३) **पुढील ओळींचे अर्थसौंदर्य स्पष्ट करा.** 2

झाडाची सहकार्याची वृत्ती विलक्षण असते. परोपकाराची भावना त्यांच्या मनात सतत जागी असते. आपल्या सर्वदूर पसरलेल्या फांद्यांमुळे झाड कडक उन्हात वाटसरूंना गारेगार सावली देते त्यांचा थकवा दूर करतं. जणू आपले बाहू पसरवून हे झाड मुसाफिरांना म्हणजे वाटसरूंना आपल्या कवेत घेते, असे वाटते.

(४) झाड कोणत्याही परिस्थितीत घट्ट पाय रोवून उभे असते. वाऱ्याच्या झुळूकीबरोबर पानांच्या सळसळाटीने हसते. पक्ष्यांच्या मंजुळ गाण्याबरोबर जीवनाचे गाणे गाते. आपल्या विशाल सावलीत मुसाफिरांना कवेत घेते. पावसाळ्यात हिरवेगार ताजेतवाने होऊन न्हाऊन निघते. पानझडीनंतर नव्या नवरीसारखा नवीन वेष धारण करते. दातृत्व हा झाडाचा मोठाच गुण आहे. फळे, फुले बहरली की झाडे ती दुसऱ्यांच्या पदरात दान करते. संपूर्ण आयुष्य हिरवगार होऊन जगते. अशाच प्रकारे माणसानेही सहनशीलता, सहकार्याची वृत्ती, कठीण प्रसंगातही घट्ट पाय रोवून ठेवण्याची वृत्ती जोपासली तर त्याचेही जीवन आनंदाने भरून जाईल. 2

उ.२ **आ. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) (i) **समान अर्थाची काव्यपंक्ती शोधून लिहा.** 1

काय करावे कळेना, नाही कष्टाचे सामर्थ्य.

(ii) **आकृतिबंध पूर्ण करा.** 1

**ज्योत ज्योत पाजळावी** → डोळ्यांतील आसवांची

(२) (i) **खालील प्रश्नाचे उत्तर एका वाक्यात लिहा.** 1

जवानाचे रक्षण असंख्य ज्योतींनी होणार आहे.

(ii) जवानासाठी कोणाचे 'औक्षण' आहे, असे कवयित्री सांगते ? 1

| | | |
|---|---|---|
| (३) | देशाच्या सीमेचे रक्षण करणारा सैनिक नेहमीच देशासाठी भूषणास्पद असतो. त्याच्या देशरक्षणाच्या कर्तव्यामुळे देशातील नागरिक सुखाची झोप घेऊ शकतात. अन्यथा परकीय आक्रमण, लढाई या संकटांमुळे आपली सुरक्षितता धोक्यात आली असती. ऊन, पाऊस, थंडी याला सामोरे जाऊन 'देशरक्षण' हेच त्यांचे ध्येय असते. जीवावर उदार होऊन ते सीमेवर न डगमगता उभे असतात. त्यांचे कुटुंब, मुले-बाळे यांना ते महिनोंमहिने भेटत ही नाही. देशरक्षणाच्या कर्तव्यासाठी आप्त स्वकीयांनाही त्यांना भेटता येत नाही. देशरक्षणाच्या कर्तव्यासाठी आप्त स्वकीयांनाही त्यांना भेटता येत नाही. खाजगी आयुष्याचा, सुखांचा संपूर्ण त्याग करुन केवळ सीमेवर हे जवान देशरक्षणासाठी सज्ज असतात. | 2 |
| (४) | **खालील काव्यपंक्तीतील आशयसौंदर्य स्पष्ट करा.**<br>उपरोक्त पंक्ती 'औक्षण' या कवितेतील असून कवयित्री 'इंदिरा संत' यांनी लढाईला जाण्यासाठी सज्ज असलेल्या जवानाचे औक्षण देशवासीयांकडून कसे होत आहे हे दर्शविले आहे.<br>जवान आपल्या जीवावर उदार होऊन लढत असतो. पराक्रमाची शर्थ करतो. तो लढाईला जाताना त्याला ओवाळण्याची म्हणजे औक्षण करण्याची प्रथा आहे. जो सैनिक देशासाठी आपले बलिदान देतो त्यासाठी आपला जीवही ओवाळला तरी कमीच आहे अशी कवयित्रीची उच्च भावना आहे. सर्वात मोलाचा माणसाचा जीव असतो. पण त्याहीपेक्षा मोलाची सैनिकाची शौर्यगाथा आहे असे कवयित्री आदराने म्हणते. त्यापुढे जीवाची शान ती किती ? अर्थात जीवही फार लहान वाटतो. | 2 |
| उ.२<br>(१) | **इ. खालील ओळींचे रसग्रहण करा.**<br>कवीने आपल्या भारत देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी एकजूटीचा मंत्र सांगितला आहे. एकजूटीचे सामर्थ्य पटवून देतांना कवी म्हणतात की, आमच्या देशात अनेक प्रकारची विविधता आहे. वेश, भाषा, धर्म, सण, खाणे अशी हजारो प्रकारची विविधता असली तरी आम्ही एकच आहोत. आमच्यातील एकता जराही कमी झालेली नाही. आम्ही भारतीय लोक देशाच्या विविध प्रांतात राहणारे असलो, वेगवेगळी भाषा बोलणारे जरी असलो, वेगवेगळे वेश घालणारे जरी असलो तरी आम्ही एकजूटीने कार्य करणारे आहोत. त्यामुळे आमच्या हाताचे मनगट बलशाली, शक्तीशाली असेच आहे. याच एकजूटीने आपण आजवर अनेक कठीण प्रसंगावर मात केलेली आहे व पुढेही करत राहू. याच शक्तीने, एकीच्या बळाने आपल्या देशाची प्रगती होईल. शत्रूला धाक बसेल, शक्तीचे प्रदर्शन होईल तसेच एकात्मतेची भावना लोकांच्या मनात अजून वाढेल, जणू सर्वत्र शक्तीची नौबत झडेल. इथे जन्माला येणारे प्रत्येक बाळ तेजस्वी व प्रबळ असेल. देशाचे रक्षण करण्यासाठी, नवीन कार्यासाठी घराघरातून जणू नवी पिढी जन्म घेईल आणि आपल्या शक्तीतून, आपल्या कार्यातून आपल्या विजयाचा अवतार साऱ्या जगासमोर उभा करेल. म्हणजेच सामर्थ्यशाली बालके जन्मास येऊन देशाचे भविष्य नक्कीच उज्ज्वल करतील, असा एक आशावाद कवीने येथे मांडलेला आहे.<br>शक्तिचा, एकजूटीचा मंत्र या कवितेतून निर्देशित होतो. एकीच्या बळकटीने देशाचे उज्ज्वल भविष्याचे स्वप्न साकारणे अशक्य नाही असा सार्थ युक्तीवाद करून कवितेत आशयपूर्णता आली आहे. बळकट, मनगट या शब्दांनी यमक साधून भाषासौंदर्य वाढले आहे. नव्या अवताराच्या संकल्पनेने काव्यसौंदर्यात भर घातली आहे. | 4 |

## विभाग ३ – स्थूलवाचन

उ.३. **खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.**

(१) जगणं कॅक्टसचं या पाठात वसंत शिरवाडकर यांनी वाळवंटी प्रदेशातील कॅक्टसवर विशेष माहिती दिली आहे. निसर्ग हा मोठा जादूगार आहे हे पटवून दिले आहे. 3

साधारणपणे पाण्याशिवाय वनस्पती जगू शकत नाही. वाळवंटात अगदीच थोडे पाणी मिळते. पण निसर्ग एक जादूगार आहे. त्या थोड्याशा पाण्यातही तो वनस्पती फुलवतो. तेथील प्राणी जगवतो.वाळवंटी प्रदेशातील खास अशी जीवसृष्टी आहे. वनस्पती व प्राणी तेथेही जगू शकतात. कॅक्टसच्या झाडांवरची लाल-पिवळी फुले चित्रमय वाटतात. वाळवंटातील जीवनसृष्टी हा खरोखर पृथ्वीवरचा एक चमत्कारच आहे. त्यामुळेच प्रतिकूल परिस्थितीतही जीवसृष्टी निर्माण करणारा निसर्ग खरेच मोठा जादूगार आहे.

(२) **व्युत्पत्ती कोशाचे कार्य :** 3

वाचन करताना अनेक वेगवेगळे शब्द डोळ्यांखालून जातात. काही शब्द लक्ष वेधून घेतात. हे शब्द कसे तयार होत असावेत याची उत्सुकता निर्माण होते. मग अशावेळेस त्या शब्दाची निर्मिती कशी झाली हे पडताळण्यासाठी व्युत्पत्ती कोश उपयोगी पडतो. व्युत्पत्ती कोश शब्दाचे मूळ रूप दाखवतो. इतकेच नव्हे तर त्यातील विस्तार संदर्भ, उच्चारातील बदल व फरक दाखवतो. याची उत्पत्ती पाहणे, उच्चार जाणून घेणे ही भाषासमृद्धीच्या दृष्टीने आनंददायी क्रिया आहे. एकाच शब्दाचे वेगवेगळ्या परिस्थितीमध्ये वेगवेगळे अर्थ असतात, हे जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. उदा. धूळ चारणे; खरे पाहता धूळ चारणे व फसवणे हे दोन अर्थ आहेत. वेगवेगळ्या संदर्भानुसार ते ते अर्थ जुळवले जातात. व्युत्पत्ती कोशातून उच्चारातील बदलांचे कारण स्पष्ट होते. अर्थातील स्पष्ट केलेला बदल अभ्यासता येतो. व्युत्पत्ती कोशातून एखाद्या शब्दाची अन्य कोणी मांडलेली व्युत्पत्ती सांगून ती योग्य व अयोग्य हे ही कळते. भाषेचे कालिक स्वरूप स्पष्ट करणे हे व्युत्पत्ती कोशाचे प्रमुख कार्य आहे.

(३) **टिपा लिहा.** 3

सग्वारो कॅक्टस वाळवंटी प्रदेशाचा अगदी खास प्रतिनिधी आहे. कॅक्टसच्या अनेक जातींमध्ये सग्वारो हा कॅक्टसचा राजा मानला जातो. तो ५० फूट उंचीपर्यंत वाढतो. त्याची वाढ मंद असते इतकी, की ५० वर्षात तो फक्त ३ फूट वाढतो आणि २०० वर्षे जगतो. सग्वारो कॅक्टसची फुले गेंदेदार असतात ही फुले फुलली की थोडा काळ तरी ओसाड वाळवंट सौंदर्यपूर्ण होते. सग्वारो कॅक्टसला फळे येतात. त्यातील गर कलिंगडासारखा असतो. सग्वारो कॅक्टस हात वर करून उभ्या राहिलेल्या एखाद्या मोठ्या बाहुल्यासारखा दिसतो.

सग्वारो कॅक्टसचा उपयोग अमेरिकेतील रेड इंडियन करीत असत. अवर्षणाच्या काळात कॅक्टस चेचून ते त्याचे पाणी काढत आणि तहान शमवण्यासाठी हे पाणी पीत. सग्वारो कॅक्टसची फळे ही कलिंगडाच्या गरासारखी असल्याने खाण्यासाठी उपयोग होतो. फळाच्या गरात साखर घालून तो मोरावळ्यासारखा टिकवता येतो. रेड इंडियन लोकांचे हे ही एक खाद्य असते.

## विभाग ४ – भाषाभ्यास

उ.४ **(अ) भाषाभ्यासावर आधारित कृती**

(i) **समास** 2

**खालील तक्ता पूर्ण करा.**

| अ.क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| (i) | **आजन्म** | जन्मापासून | अव्ययीभाव समास |
| (ii) | **सत्यासत्य** | सत्य किंवा असत्य | वैकल्पिक द्वंद्व समास |

(ii) **अलंकार** 2

खालील उदाहरण कोणत्या अलंकाराचे आहे हे ओळखून त्याच अलंकाराचे दुसरे उदाहरण लिहा.

**उदा.** नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।।

वरील उदाहरण हे 'यमक' अलंकाराचे आहे.

'यमक' अलंकाराचे दुसरे उदाहरण : 'जाणावा तो ज्ञानी । पूर्ण समाधानी ।
नि:संदेह मनी । सर्वकाळ ।।

(iii) **वाक्यरूपांतर**

**कंसातील सूचनेप्रमाणे वाक्य परिवर्तन करून लिहा.**

१. आमच्याजवळ एवढे पैसे कुठूनही येणार नाहीत. 1

२. रांगेत उभी रहा, तशीच ताटकळत. 1

(iv) **सामान्यरूप**

**कंसात दिलेल्या शब्दांचे सामान्यरूप करून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. देवळाच्या पुजाऱ्याकडे लोक गेले. 1

२. अमोल बागेत खेळत होता. 1

(v) **वाक्प्रचार**

**खालील वाक्प्रचार वाक्यात योग्य ठिकाणी वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. मला महाबळेश्वरच्या डोंगररांगांनी **भुरळ घातली.** 1

२. पावसाळ्यातील इंद्रधनुष्याने माझ्या मनावर **किमया केली.** 1

उ.४ **(ब) स्वाध्यायावर आधारित कृती.**

(१) **शब्दसंपत्ती** 1

(i) **समानार्थी शब्द लिहा.**

१. उसंत - वेळ २. आहार - जेवण

| | | |
|---|---|---|
| (ii) | **विरुद्धार्थी शब्द लिहा.**<br>१. गोड × कडू    २. थंडी × गरमी | **1** |
| (iii) | **खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.**<br>भाषण करण्याची जागा - व्यासपीठ | **1** |
| (iv) | **एका शब्दाचे भिन्न अर्थ लिहा.**<br>विश्व ← जग → पाण्याचे भांडे | **1** |
| (२) | **लेखननियमांनुसार लेखन** | |
| (i) | **अचूक शब्द ओळखून लिहा.**<br>१. लिंबोणी<br>२. साहित्यिक | **1** |
| (ii) | **खालील वाक्य लेखननियमानुसार शुद्ध करून लिहा.**<br>त्याच्या **हाती पोस्टमनने** दिलेले पत्र होते. | **1** |
| (३) | **विरामचिन्हे**<br>**खालील तक्ता पूर्ण करा.** | **2** |

| विरामचिन्हे | नाव |
|---|---|
| (१) (!) | उद्गारचिन्ह |
| (२) (-) | संयोगचिन्ह |
| (३) (:) | अपूर्ण विराम |
| (४) (‘......’) | एकेरी अवतरण चिन्ह |

| | | |
|---|---|---|
| (४) | **पारिभाषिक शब्द**<br>**खालील शब्दांना पारिभाषिक शब्द लिहा.**<br>१. Lift - उद्वाहन यंत्र    २. Mobile - भ्रमणध्वनी | **1** |
| (५) | **भाषिक खेळ**<br>**खालील शब्द अकारविल्हेनुसार लावा.**<br>औषध, दवाखाना, परिचारिका, रुग्णालय | **1** |

## विभाग ५ – उपयोजित लेखन

उ.५ **अ. खालील कृती सोडवा.**

(१) **पत्रलेखन** 5

**खालील निवेदन वाचा व संबंधित व्यक्तीस विनंती करणारे पत्र विद्यार्थी म्हणून लिहा.**

दिनांक १७ जुलै, २०१८

प्रति,

मा. मुख्याध्यापक,

केळकर विद्यामंदिर,

ता. राजापूर,

जि. रत्नागिरी.

**विषय** : गरीब विद्यार्थी फंडातून गणवेश व शैक्षणिक साहित्य मिळण्याबाबत विनंती अर्ज...

आदरणीय गुरुवर्य,

सप्रेम नमस्कार,

मी अ.ब.क. आपल्या शाळेत इयत्ता '८ वी ब' मध्ये शिकत आहे. माझ्या वडिलांचे वार्षिक उत्पन्न फारच कमी आहे. त्यामुळे मला शाळेचा गणवेश व शैक्षणिक साहित्य विकत घेणे अशक्य आहे.

मला वर्गशिक्षकांकडून असे कळले की, आपल्या शाळेतून गरीब विद्यार्थ्यांना गणवेश, शैक्षणिक साहित्यासाठी सहाय्य केले जाते. तरी मला शाळेकडून तो लाभ मिळावा, ही विनंती.

कळावे, तसदीबद्दल क्षमस्व.

आपला विद्यार्थी,

अ.ब.क.

पितृसदन, मु.पो. राजापूर,

ता. राजापूर, जि. रत्नागिरी.

(२) **सारांश लेखन** 5

**खालील उतारा वाचा व त्याच्या एकतृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दात लिहा.**

दूरदूरून येणाऱ्या माणसांच्या वाढत्या संख्येमुळे शहर वाढते. माणसाची पोटापाण्याची गरज आणि जगण्याची आशा - अपेक्षा त्याला शहरात घेऊन येते. शहरात माणसे जमेल तसा कोठेही संसार मांडतात. त्यामुळे शहरे, बंगले, इमारती व संकुले यांच्याबरोबरच झोपडवस्त्यामधूनही उभी राहत असतात.

| | | |
|---|---|---|
| उ.५ | **आ. खालील कृती सोडवा.** | |
| (१) | **बातमी लेखन** | **6** |
| | **खाली दिलेल्या विषयावर बातमी तयार करा.** | |
| | **आमच्या वार्ताहराकडून** **दिनांक : २ मार्च, २०१७** | |
| | **सर्व शिक्षा अभियान - हितगुज मेळावा** | |
| | ठाणे- सर्व शिक्षा अभियान, शिक्षण विभाग ठाणे, यांच्या वतीने ठाणे येथील सरस्वती महाविद्यालयाच्या भव्य पटांगणात जागतिक महिला आरोग्य दिनाच्या निमित्ताने दिनांक २७ फेब्रुवारी ते १ मार्च या कालावधीत सर्व शाळातील इयत्ता ८ वी ते १० वीत शिकणाऱ्या विद्यार्थिनींसाठी 'आरोग्य, स्वच्छता व हितगुज मेळाव्याचे' आयोजन केले होते. तीन दिवस चाललेल्या या मेळाव्याचे उद्घाटन ठाणे तालुक्याचे आमदार बाळासाहेब देखणे यांनी केले. | |
| | तीन दिवस चाललेल्या या मेळाव्यात कुशल व नामवंत डॉक्टरांनी विद्यार्थिनीना मार्गदर्शन केले. किशोरवयीन मुलींचे व्यक्तिमत्त्व विकास, आहार, आरोग्य तसेच वैयक्तिक स्वच्छता, निरोगी शरीर, मन:शांती, योग, हलके व सहज करता येणारे व्यायाम, चांगल्या सवयी व नियमितपणाचे महत्त्व या विषयांवर तज्ज्ञ डॉक्टरांनी उचित मार्गदर्शन केले. मेळाव्यात सहभागी विद्यार्थिनींची रक्त तपासणीही करण्यात आली. अनेक स्पर्धांचे व मनोरंजनाच्या कार्यक्रमाचे आयोजनही करण्यात आले. स्पर्धेतील विद्यार्थिनींचा सहभाग व उत्साह लक्षवेधी होता. भोजन व निवासाची उत्तम सोय करण्यात आली होती. | |
| | मेळाव्याच्या शेवटच्या दिवशी स्पर्धेतील विजयी स्पर्धकांना बक्षीसे व प्रमाणपत्र देण्यात आली. सुप्रसिद्ध लेखिका सौ. स्वप्नाली कर्णिक यांनी सर्वांचे आभार मानले व विद्यार्थिनींचे कौतुक करून आरोग्याची काळजी घेण्याबाबत सूचनाही दिल्या. तसेच त्यांनी शिक्षण विभागाच्या या चांगल्या कार्याचे तोंड भरून कौतुक करून सर्वांचे आभार मानले. उत्साहात, आनंदात व जोशात या कार्यक्रमाची सांगता झाली. | |
| (२) | **कथा लेखन** | **6** |
| | **दिलेल्या शीर्षकावरून कथा तयार करा.** | |
| | **करावे तसे भरावे** | |
| | सोनापूर गाव नावाप्रमाणेच सोन्यासारखे सुंदर होते. निसर्गाने जणू काही मुक्त हस्ताने सौंदर्य उधळले होते या गावावर. गावातून एक नदी वाहत होती. याच छोट्याशा गावात रामू नावाच्या एका शिंप्याचे दुकान होते. | |
| | गावात एकदा सर्कस आली. सर्कशीतला हत्ती रोज नदीवर स्नानासाठी जाई. जाताना तो शिंप्याच्या दुकानापाशी थांबे. शिंपी त्याला रोज काही ना काही खायला देत असे. मग हत्तीसुद्धा खूश होऊन त्याला सोंडेने सलाम करीत असे. | |
| | एके दिवशी, शिंप्याच्या मनात विचार आला की, आपण या हत्तीची गंमत करावी. नेहमीप्रमाणे हत्ती नदीवर जाताना शिंप्याच्या दुकानाजवळ आला. पण आज मात्र खाऊ देण्याऐवजी त्याने हत्तीच्या सोंडेला सुई टोचली. अरेरे! बिचारा हत्ती! वेदनेने कळवळला, पण आपले दु:ख बिचाऱ्या मुक्या जनावराला व्यक्त करता येईना. तो तसाच पुढे नदीवर गेला. मनात मात्र शिंप्यावरचा राग धुसफुसत होता. त्यानेही रामूला धडा शिकविण्याचे ठरविले. | |

आंघोळ करून झाल्यावर हत्तीला युक्ती सुचली. नदीजवळच एक घाणेरड्या पाण्याचे डबके होते. त्याने ते घाणेरडे पाणी आपल्या सोंडेत घेतले व तो शिंप्याच्या दुकानाजवळ परत आला. शिंपी कपड्यांचा पसारा काढून कपडे शिवत बसला होता. त्याने ते सोंडेतले घाणेरडे पाणी शिंप्याच्या दुकानातील सर्व कपड्यांवर उडवले. अशाप्रकारे त्याने शिंप्याला चांगलाच धडा शिकवला.

उ.५ **इ. लेखनकौशल्य**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा. (१०० ते १२० शब्द)** 8

(१) **मला पंख असते तर ....**

रविवारची संध्याकाळ होती, मी दादरच्या चौपाटीवर बसून, फेसाळणाऱ्या लाटा पहात होतो. या अथांग सागराला वरून पहायला मिळाले तर... तो किती छान दिसेल, असा विचार माझ्या मनात आला. आकाशात काही पक्षी उडताना दिसत होते. त्या पक्षांना पाहून, क्षणभर माझ्या मनात विचार आला. या पक्ष्यांसारखे मलाही पंख असते तर ...... वा ! काय मजा येईल ! मी आकाशात उंचच उंच भराऱ्या मारेन. आकाशात उडणाऱ्या पक्ष्यांशी स्पर्धा करेन. निळ्या निळ्या आकाशाला आणखी जवळून पाहण्याचा प्रयत्न करेन. स्वच्छ आणि मोकळ्या हवेला पाहण्याचा प्रयत्न करेन. स्वच्छ आणि मोकळ्या हवेत ऊर भरून श्वास घेईन. अथांग पसरलेल्या सागरात माझे प्रतिबिंब पाहीन. तिन्हीसांजेच्या सूर्यास्ताची लाली डोळ्यात साठवेन. पावसाचा पहिला थेंब अलगद झेलेन. बापरे ! मला पंख लाभले तर किती आनंद उपभोगता येईल. मला गाण्याचे शब्द आठवतील ...........

'तुज पंख दिले देवाने
कर विहार सामर्थ्याने'

पंख लाभल्यामुळे सकाळी लवकर उठायची भीती नसेल, शाळेचा तगादा नसेल. अभ्यासाची, शिक्षकांची, शिकवणीची सक्ती कोणी करणार नाही. अभ्यासासाठी स्पर्धा नसेल. रोज रोजचे तेच कंटाळवाणे जीवन नसेल. सकाळी पहाट होईल तेव्हा मी उठेन. नुकत्याच उगवलेल्या सूर्याच्या साक्षीने आकाशात झेपावेन. कोणत्याही झाडावर जा, पाहिजे ते फळ खा. किती मजा येईल ना! सकाळची कोवळी उन्हं पाठीवर घेवून हिरव्यागार गवतावरून भराऱ्या मारता येतील. रंगीबेरंगी व सुगंधी फुलांना अनुभवता येईल. निसर्गाचं शुद्ध स्वरूप पहाता येईल. उडता उडता मी, कधी झाडाच्या टोकावर बसेन, तर कधी गवताच्या पात्यांवर कधी गर्द झुडपांमधे तर कधी मोकळ्या माळरानात, कधी द्राक्षांच्या मळ्यात तर कधी आंब्याच्या बागेत ! मानवी वस्ती किती चिमुकली दिसते हे डोंगराच्या माथ्यावरून पाहीन. सागराच्या हेलकावणाऱ्या लाटांवर बसून पाण्यावर झुलण्याची मजा घेईन. जेव्हा पावसाळा येईल तेव्हा आकाशातून बरसणाऱ्या पावसाच्या धारा आपल्या पंखांवर झेलत, मनसोक्त भिजेन.

रेल्वेचं तिकीट न काढता संपूर्ण भारतभ्रमण करेन. हिमालयाची शुभ्रता डोळ्यात साठवेन, काश्मीरचं स्वर्गिय सौंदर्य पाहीन. पंजाबच्या हिरव्यागार शेतातील धान्य हळूच चोरून खाईन. दिल्लीच्या लाल किल्ल्याला सलाम करेन. आसामातील टेकड्यातून विहार करेन. कुतुबमिनाराच्या टोकावर बसून सभोवार नजर टाकेन. दक्षिणेतल्या मंदिरांचे सुंदर सुंदर आकार पाहीन. जेव्हा मला सूर्यास्त पाहावासा वाटेल तेव्हा कन्याकुमारीला, स्वामी विवेकानंदांच्या पुतळ्याशेजारी बसून पाहीन.

मला पंख लाभले तर, सुरूवातीला हे सारं छान वाटेल पण आकाशातील इतर पक्षी मला आपल्यात सामावून घेणार नाही. हा कोणीतरी वेगळा परका आहे असे मानून त्यांच्या त्या धारदार, टोकदार चोचीने टोचून मला हैराण करतील. शिवाय त्यांच्याबद्दल मी कोणाकडे तक्रारही करू शकणार नाही. त्याचबरोबर आपलं घर, आई, बाबा, मित्र, सवंगडी या सगळ्यांमध्ये एकटं एकटं आणि विचित्र वाटू लागेल. असा विचार मनात आला आणि मन अस्थिर झाले. 'ठेवीले अनंते तैसेची रहावे, चित्ती असू द्यावे समाधान' हे तुकाराम महाराजांचे शब्द कानात घुमू लागले.

मला पंख लाभले असते तर खूप मजा आली असती पण या जन्मी तर ते शक्य नाही. पुढच्या जन्मी नक्कीच मला पंखासह पक्षी व्हायला आवडेल.

'आम्ही पाखरं, पाखरं, या रानाची लेकरं
हिरव्या या फांदीवर, बांधितो आपले घर
आम्ही पाखरं, पाखरं, आम्हा मुक्त दाही दिशा
निसर्गाचं लेणं पहावं, हीच मनोमनी आशा'

(२) **विदूषकाचे आत्मवृत्त** ४

'डोळ्याभोवती मोठे पिवळे वेटोळे. लालचुटूक नाक, डोक्यावर लांब टोपी, अंगावर सैलसर चट्ट्यापट्ट्यांचा पोशाख, काय मंडळी ओळखलंत का मी कोण आहे ते? होय, अगदी बरोबर ! तुम्हांला हसवणारा, तुम्हाला आवडणारा मी सर्कशीतला विदूषक आहे.

आत्मकथन म्हटलं की साहित्यिक, राजकारणी, समाजसेवक सहज डोळ्यासमोर येतात. पण तुम्ही कधी आमच्या आयुष्यात डोकावून बघितलं आहे का? नाही ना. चला तर, मी तुम्हांला माझ्या आयुष्याची सफर घडवून आणतो.'

'मी एका गरीब कुटुंबात जन्माला आलो. गरीब वस्तीत वाढल्यामुळे मला समाजातल्या सर्व स्तरातल्या लोकांना पाहता आले. याचाच परिणाम की काय मी हळूहळू अनेकांच्या नकला करायला लागलो. चौथीपर्यंत कशीबशी शाळा झाली. पुढे घरची परिस्थिती शिक्षण घेऊ देईना म्हणून छोटी-मोठी कामे करायला सुरूवात केली. ज्या लहान वयात बागडायचं, खेळायचं, हसायचं, त्या वयात मी डोक्यावर कुटुंबाचा भार वाहत होतो. खेळणारी, बागडणारी, हसणारी मुले बघितली की, मन विषण्ण व्हायचं. पण या अनुभवाने मला जगाकडे बघण्याचा नवीन दृष्टिकोन मिळाला. मनाशी ठरवलं आपल्या हसण्याखिदळण्याच्या वयात जे जमलं नाही त्यापासून इतरांना वंचित होऊ द्यायचं नाही. माझा एक मित्र सर्कशीत काम करत होता. त्याने मला विचारले, 'तू सर्कशीत काम करशील का?' मी तात्काळ 'हो' म्हटलं.'

'तोंडाला रंग लागला. तंबूवर दिव्यांची रोषणाई झळकू लागली. तंबूत लोकांची गर्दी जमा झाली, वाद्यवृंद सुरू झाला आणि माझा विदूषकाचा डाव सुरू झाला. त्या दिवसापासून ते आजपर्यंत प्रत्येक खेळाला बदलणारे दर्शक दिसतात पण आम्ही मात्र तेच असतो. त्याच कसरती पण हशा मात्र नवा असतो. घोड्यावर उलटं बसणं, चित्रविचित्र बोलणं, कोलांटी उडी मारणं आणि नकला करणं हा माझ्या जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. सुरूवातीला काम म्हणून मी माझ्या पेशाकडे पाहायचो. पण आता लोकांना हसवणं माझा छंद बनला आहे. आपण आपल्या लहानपणी हरवलेलं 'हसू' जेव्हा मी लहानथोरांच्या चेहऱ्यावर पाहतो, तेव्हा माझा आनंद गगनात मावेनासा होतो.'

आमच्या जीवनाचे सूत्र आहे, 'Show must go on'. तुम्हाला बरं असो वा नसो, घरात एखादा बिकट प्रसंग असो, वेदना मुखवट्यामागे लपवाव्या लागतात आणि चेहरा हसरा ठेवून 'हसण्यासाठी' आलेल्या जनतेला मनमुराद हसवावं लागतं. एकदा माझ्या खेळादरम्यान माझ्यापर्यंत एक निरोप पोहोचला. निरोप असा होता की, माझ्या घरी माझ्या आईचा मृत्यू झाला होता. बातमीने वेदनेची कळ हृदयात उमटली, खेळ अर्धवट सोडून जायचं की नाही, या द्‌विधा मन:स्थितीने मी ग्रासलो होतो. शेवटी ठरवलं हा आयुष्याचा खेळ आहे, चालू राहिलाच पाहिजे. मी रडत होतो, माझ्या हालचाली संथ होत होत्या, लोकांना मात्र वाटत होते की, हा विदूषकाच्या कसरतीचाच एक भाग आहे. लोक खो-खो हसत होते. त्यांच्या हसण्याने माझ्या काळजाच्या जखमेला औषध मिळालं.'

हे असं क्षणभंगूर जिणं घेऊन आज इथे तर उद्या तिथे. तोच तंबू, तेच सहकारी, तेच प्राण्यांचे पिंजरे, पण बदलतो तो फक्त गाव. जेव्हा लोक उभे राहून टाळ्यांचा गजर करतात, वाटतं 'आपल्या कामाची हीच पावती आहे'. बरं आहे मंडळी, चला तुमची रजा घेतो. शिट्टी वाजली आहे. माझ्या 'ह्रिब' ची वेळ झाली आहे. नाटकं आणि सिनेमा तुम्ही नेहमीच पाहता. त्यात असणारे सारेच प्रसंग नाट्यमय आणि कृत्रिम असतात. अस्सल जीवनाला जवळून पाहण्यासाठी, मला भेटण्यासाठी एकदा नक्कीच आमच्या सर्कशीला भेट द्या. याल ना?'

❖❖❖❖❖